# एम डी पवार पीपल्स को;लि बँक ऑप-

# उरूण इस्लामपूर

# लॉकर धोरण

# (Locker Policy)

# सन २०२५२६-

आरबीआयच्या दिनांक १८.०८.२०२१ च्या परिपत्रक RBI/२०२१-२०२२/८६/DOR.LEG.REC.40/ 09.07.005/2021-22 मधील निर्देशानुसार, बँकेने लॉकर धोरणात बदल केलेले आहेत व त्याचा आढावा दिनांक २९/०४/२०२५ रोजीच्या मा. संचालक मंडळ मिटिंग मध्ये ठ नं ५ ने घेतला असून ते बँकांमधील नवीन आणि विद्यमान दोन्ही सेफ डिपॉझिट लॉकर्सना लागू होतील.

**प्रस्तावना :-**

दागदागिने, जड-जवाहीर व इतर अनुषंगिक अनमोल वस्तू, कागदपत्रे, मुळ दस्ताऐवज, प्रमाणपत्रे इ. घरात ठेवणे म्हणजे चोर, दरोडेखोर व नैसर्गिक आपत्तीची भिती यामुळे खूप मोठी जोखीम आहे. दागदागिने व तद्नुषंगिक अनेक अनमोल वस्तूंची सुरक्षितता जपण्यासाठी, सधन व मध्यमवर्गीय अशा सर्वच स्तरातील, जनसामान्यांसाठी बँकेने लॉकर सुविधेचा अवलंब केलेला आहे. सदरचे लॉकर्स बँकेच्या ग्राहकांना भाडे तत्वावर दिले जातात. ही सुविधा इतर सेवांपैकी एक सेवा आहे.

रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शन तत्वाप्रमाणे व वेळोवेळी दिलेल्या सूचनेप्रमाणे बँकेकडील खातेदाराच्या सेवेकरीता लॉकर संबंधी धोरण तयार करणेत आलेले असून ते खालीलप्रमाणे राहील.

**१) व्याख्या**

१.१ बँक म्हणजे एम डी पवार पीपल्स् को-ऑपरेटिव्ह बँक लि., उरूण इस्लामपूर

१.२ खातेदार म्हणजे बँकेचे ठेव व कर्ज खातेदार व ज्यांना लॉकर संबंधीत सुविधा आवश्यक आहे असे ग्राहक.

१.३ नियमावली तयार करणारी ॲथॉरिटी म्हणजे रिझर्व्ह बँक होय जी वेळोवेळी लॉकर संबंधी नियमावली तयार करेल व आवश्यकतेनुसार बदल करेल .

१.४ नियम म्हणजे बँकेचे पोटनियम व रिझर्व्ह बँकेने सूचीत केलेले नियम.

१.५ बँक व लॉकरधारक यांच्यातील संबंध हे लॉकर मालक (Lessor) व लॉकर भाडेकरु हे (Lessee) असतील. ते बँक व ग्राहक (कस्टमर) असे असणार नाहीत.

**२) सेफ डिपॉझीट लॉकर-**

२.१ जे बँकेचे ग्राहक आहेत (ठेव/कर्ज खातेदार/सभासद) असतील ते लॉकर सुविधेस पात्र असतील.

२.२ जे बँकेचे पूर्व ग्राहक नाहीत ते देखील या सुविधेस पात्र असतील

२.३ खातेदारांनी बँकेकडील रितसर लॉकर मिळणेबाबत अर्ज शाखेकडे सादर करणे आवश्यक आहे. लॉकर संबंधीचा अर्ज शाखेकडे उपलब्ध असेल.

२.४ शाखेकडे लॉकर उपलब्ध असतील तर ग्राहकांचे रितसर अर्ज व "आपला ग्राहक ओळखा" (KYC) अंतर्गत आवश्यकतेनुसार सर्व पूर्तता करुन त्यांना देण्यांत येईल. आणि जर मागणी करतेवेळी लॉकर उपलब्ध नसतील तर त्याची वेटींग लिस्ट तयार करण्यांत येईल व प्रतीक्षा यादीतील अनुक्रमांकाची नोंद असलेली पावती ग्राहकास दिली जाईल व जसे लॉकर उपलब्ध होतील त्याप्रमाणे First Come First Base या तत्वावर देण्यात येईल.त्याचप्रमाणे शाखानिहाय रिकाम्या लॉकर्सची यादी संगणक प्रणालीमध्ये उपलब्ध करून दिली जाईल.

**२.५ लॉकर खातेदारांना देण्यासंबंधीत शाखेकडून निर्णय झाल्यास खालील गोष्टींची पूर्तता करणे आवश्यक आहे.-**

२.५.१ आरबीआयचे KYC संदर्भात असलेल्या मुख्य मार्गदर्शक सुचनेच्या अधीन राहून बँकेच्या संचालक मंडळाने मंजूर केलेल्या केवायसी धोरणानुसार १००% पूर्तता करणे आवश्यक आहे.

२.५.२ ज्यांना लॉकर ऑपरेट करणेचा अधिकार असेल त्यांनी पत्ता, फोटो, फोन नं.. मोबाईल नं. व शाखेकडील सेव्हिंग्ज, चालू खाते तपशिल देणे आवश्यक आहे व सदरच्या नोंदी/माहीती अद्यावत देणेची जबाबदारी खातेदाराची राहील.

२.५.३ नियमाप्रमाणे करारपत्र व इतर कागदपत्राची पूर्तता करणे आवश्यक आहे. (सध्या रु. १००/- स्टॅम्पबाबत वेळोवेळी जे लागतात त्या रक्कमेचा देणे आवश्यक राहील.)

२.५.४ ग्राहकाने/लॉकरधारकाने करारपत्राची प्रत मिळणेसाठी विनंती केलेस अशा लॉकरधारकाला करारपत्राची प्रत विनंती अर्जानुसार देणेत येईल.

२.५.५ लॉकर जर जॉईंट नांवाने सुरु करावयाचे असेल तर जास्तीत जास्त ४ व्यक्तींच्या नांवाने सुरु करता येईल. (सर्वांची केवायसी पूर्तता असणे आवश्यक आहे.) सर्वांनी करारपत्रावर सह्या करणे आवश्यक राहील/ अधिकार व व्यवहार करणेबाबत नोंद करणे आवश्यक राहील.

२.५.६ जर एका नांवाने लॉकर खाते सुरु असेल व जर खातेदारांनी तो लॉकर संयुक्त करणेबाबत अर्ज दिलेला असेल तर नवीन करारपत्र व स्टँप घेवून लॉकर ऑपरेट करणेत येईल.

२.५.७ लॉकरधारकाचे बँकेत चालू / सेव्हिंग्ज खाते असणे आवश्यक राहील/उघडावे लागेल.

२.५.८ धर्मादाय संस्था/सहकारी संस्थांना लॉकर भाडे देतांना संस्थेचा ठराव, पोटनियम प्रत, संस्था नोंदणी दाखला,ज्यांना सत्यांचे अधिकार दिलेले आहेत त्यांची केवायसी/ठराव याची पूर्तता १००% असणे आवश्यक राहील.

## ३) लॉकर डिपॉझीट -

३.१ प्रत्येक नवीन लॉकरधारकाने नियमाप्रमाणे लॉकर डिपॉझीट भरणे आवश्यक आहे. ती रक्कम सर्वसाधारणपणे एखादे लॉकर ब्रेक ओपन करणेकरिताचा येणारा खर्च तसेच ३ वर्षाइतकी लॉकर भाड्याची रक्कमेइतकी असेल.

३.२ त्याचप्रमाणे सर्व लॉकर धारकाना याबाबत पूर्व सूचना दिली जाईल व मुदत ठेव जमा करण्याकरिता मुदत दिली जाईल परंतु पूर्वी पासून लॉकर खाते समाधानकारक वापरत असलेल्या खातेदाराना लॉकर डिपॉजिटबाबत सक्ती केली जाणार नाही. सदर लॉकर डिपॉझीट रक्कम वेळोवेळी बदलण्यांचा अधिकार बँकेस राहील, त्याप्रमाणे तो लागु राहिल. सदर पावती ऑटोरिन्युअल होईल तसेच लॉकर बंद झालेनंतरच सदर पावती बंद केली जाईल.

३.३ जर खातेदाराने प्रतीवर्षी लॉकर भाडे भरले नाही अथवा सलग ३ वर्षे कोणतेही व्यवहार केले नाहीत तर ते लॉकर ब्रेक करतांना होणारा खर्च व भाडे हे लॉकर डिपॉझीट मधुन वसुल केले जाईल व खातेदारास लेखी कळविले जाईल.

**४) नामनिर्देशन-**

४.१ प्रत्येक लॉकरधारकाला लॉकर खातेवर नामनिर्देशन नोंद करता येईल.

४.२ बँकिंग रेग्युलेशन अॅक्ट १९४९ (AACS) मधील कलम ४५ZC ते ४५ ZF नुसार मधील नामनिर्देश व को ऑप बँक नॉमिनेशन रूल १९८५ अन्वये नामनिर्देशन करणेत येईल.

४.३ व्यक्तिगत नावाने लॉकर असल्यास फक्त एकाच व्यक्तीचे नावे नामनिर्देशन करता येईल.

४.४ संयुक्त नावाने लॉकर असल्यास व लॉकर ऑपरेशन देखील संयुक्त असल्यास जितकी संयुक्त नावे आहेत तितके नामनिर्देशन देता येईल

४.५ सहकारी संस्था/धर्मादाय संस्था/कंपनी यांच्या नांवाने लॉकर असेल तर ते नामनिर्देशन करू शकणार नाहीत.

४.६ अज्ञान व्यक्तीचे नाव नामनिर्देशित व्यक्ति म्हणून नोंद करता येईल.

४.७ नामनिर्देशनामध्ये वेळोवेळी बदल करणेचा अधिकार लॉकरधारकास राहील.

४.८ नामनिर्देशनाचा फॉर्म स्वतंत्रपणे भरुन घेणे आवश्यक आहे.

४.९ नामनिर्देशनाच्या नोंदीसंबंधी ,बदलासंबंधी,रद्द केले संबंधीस्वतंत्र रजिस्टर ठेवले जाईल.

४.१० जर लॉकरधारकाने नामनिर्देशनाची नोंद केली नसल्यास, अशा परिस्थितीमध्ये बँक कायदेशीर सरळ वारसदार पुरावा दाखल केल्यानंतर लॉकर वापरणेस बँक परवानगी देईल.

**५) लॉकरभाडे -**

५.१ बँक वेळोवेळी ज्या दराने ठरवील ते भाडे प्रतीवर्ष भरणे आवश्यक आहे.

५.२ लॉकर भाडे आकारणी वार्षिक असेल व ती पूर्ण वर्षाची आगाऊ भरणे आवश्यक आहे.

५.३ ज्या महिन्यात लॉकर सुरु झाले तो महिना पूर्ण धरणेत येईल. तेथुन पुढे १२ महिने लॉकर भाडे घेण्यांत येईल. सदरचे भाडे ज्या त्या वर्षाच्या नफातोटा खाती पूर्णपणे जमा देणेत येईल.

५.४ लॉकर भाडेमध्ये वेळोवेळी बदल करणेचा अधिकार संचालक मंडळास राहील. बदललेले दर व सध्याचे दर बँकेच्या नोटीस बोर्डावर वेळोवेळी प्रसिध्द केले जाईल.

५.५ लॉकरधारकाने प्रती वर्षी आगावू भाडे भरणे आवश्यक राहील. उदा. २५ एप्रिल रोजी घेतलेले लॉकरचे भाडे १ वर्ष म्हणजेच ३१ मार्च अखेरचे आगाऊ असेल.
५.६ लॉकर भाडे प्रलंबित असेल तर त्यास लॉकर व्यवहार करता येणार नाही किंवा भाडे भरुन घेवूनच त्याला लॉकर
व्यवहार करता येईल.
५.७ लॉकरभाडे जर खातेदारांनी भरले नाही तर त्याच्या लॉकर डिपॉझीट मधुन वसुल करणेचा अधिकार बँकेस राहील.
५.८ लॉकर भाडे येणे रक्कमेचा जनरल लीन हे इतर ठेवीवर राहील असे भाडे या ठेवीतून / इतर खातेमधून घेणेचा अधिकार बँकेस राहील.
५.९ लॉकरचे भाडे न भरल्यास किंवा ते देय असताना, लॉकर धारकस लॉकरमध्ये प्रवेश नाकारण्याचा आणि लॉकर उघडण्याच्या बँकेच्या अधिकाराला बाधा न आणता अधिकार असेल.

**६) लॉकर परत करणेबाबत**

६.१ खातेदारास लॉकर नको असेल तर लॉकरधारकांना बँकेकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.
६.२ खातेदाराने लॉकर मधील सर्व वस्तू ताब्यात घेवून किल्ली बँकेस परत करणे आवश्यक आहे.
६.३ लॉकर परत देतांना आगाऊ भरलेल्या भाड्यापैकी पुढील उर्वरित कालावधीचे भाडे खातेदारास परत केले जाईल
६.४ लॉकर  डिपॉझीटची रक्कम परत करणेत येईल.
६.५ संयुक्त लॉकरधारक असेल तर सर्वांची संमत्ती / अर्ज घेवून खाते बंद करणेत येईल.
६.६ लॉकर मधील सर्व ऐवज परत मिळाल्याचे खातेदाराकडून पत्र घेण्यांत येईल व संबंधित अधिकाऱ्यांनी त्याची तपासणी करुन घेणे आवश्यक आहे.
६.७ बँकेला वाटल्यास बँक लॉकर धारकाला १ महिन्याची अगावू नोटीस देवून; लॉकर रिकामा करणेस सांगेल. जर लॉकर रिकामे न केलेस बँक सदर लॉकर रिकामे करण्यासाठी दोन साक्षीदाराच्या संमतीने रिकामे करेल व लॉकरमध्ये
असलेली चीज वस्तू बँकेच्या ताब्यात राहतील. अशावेळी खातेदारांची लेखी मागणी आलेस ती परत केली जाईल.

**७) लॉकरची किल्ली हरविलेस-**

७.१ खातेदाराकडून लॉकर कि हरविलेस याबाबत खातेदारांना बँकेस लेखी अर्ज करणे आवश्यक आहे. त्यामध्ये लॉकर ब्रेक ओपन करणे व नवीन दुसरी चावी मिळणेबाबतचा उल्लेख करणे

आवश्यक राहील. तसेच किल्ली हरविले नंतर जर खातेदाराने लेखी कळविले नसलेस त्याची सर्वस्वी जबाबदारी लॉकर धारकावर राहील.
७.२ लॉकर ब्रेक करतांना होणारे चार्जेस संबंधित खातेदाराकडून आगाऊ वसुल केल्यानंतरच खातेदाराच्या समोर लॉकर ब्रेक केले जाईल.
७.३ लॉकर ब्रेक करतांना इतर कोणताही खर्च/नुकसान झालेस लॉकरधारकाकडून वसुल केला जाईल.
७.४ लॉकरची किल्ली बदलणे/दुसरी करणे, कुलुप बदलणे इ. सर्व कामे बँकेने नेमलेल्या अधिकृत कंपनी / व्यक्तीकडूनच केले जाईल.
७.५ अधिकृत व्यक्तीकडे जर लॉकर कि नसेल, तर तत्पूर्वी योग्य त्या कागदपत्राची पूर्तता व अनुमती घेवूनच लॉकर ब्रेक ओपन केले जाईल.

**८) लॉकर भाडे भरले नसलेस लॉकर ब्रेक करणेबाबत-**

८.१ लॉकरधारकाने जर सलग २ वर्षाचे भाडे भरले नसेल तर बँकेस लॉकर ब्रेक करणेचा अधिकार राहील.
८.२ खातेदारांना वेळोवेळी लेखी व तोंडी सूचना देवून देखील त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळत नसेल तर लॉकर ब्रेक ओपन करता येईल.
८.३ लॉकर ब्रेक करतांना योग्य ती रजिस्टर नोटीस त्यांच्या अवगत असलेल्या पत्त्यावर पाठवून दिली जाईल जर ती नोटिस परत आल्यास स्थानिक वर्तमान पत्रामध्ये नोटिस देवून तसेच बँक नोटीस बोर्डावर जाहिर करून लॉकर ब्रेक केले जाईल.
८.४ लॉकर ब्रेकसाठी झालेला खर्च खातेदाराकडून वसुल केला जाईल. सदरची रक्कम त्याच्याकडील सेव्हिंग्ज अगर इतर खातेमधुन किंवा लॉकर कि डिपॉझीट मधुन वसुल केली जाईल.
८.५ लॉकर ब्रेक करताना, दोन साक्षीदार (बँकेचे ग्राहक) समोर लॉकर ब्रेक करण्यात येईल व विडियो शूटिंग केले जाईल व लॉकर मधील साहित्याची यादी करून त्याचा रितसर पंचनामा करुन त्या सर्व वस्तू व इतर कागदपत्रे शाखाव्यवस्थापकाच्या जॉईंट कस्टडीमध्ये राहतील. ज्यावेळी तो खातेदार वस्तू व इतर कागदपत्राची मागणी करेल तेव्हा त्यास परत देण्यांत येईल. सदरच्या वस्तू / कागदपत्रे परत देताना भाडे बाकी व ब्रेक ओपनचा खर्च वसुल करुनच वस्तू परत देता येतील. याबाबत खातेदारांनी कोणतीही तक्रार केलेस ती ग्राह्य धरली जाणार नाही.
८.६ साक्षीदाराच्या समक्ष सर्व वस्तू/कागदपत्रे देण्यांत येतील. सदरचे लॉकर दुसऱ्या खातेदारास भाडेने देण्यास पात्र राहील.
८.७ मुख्य कार्यालयाची परवानगी घेवून लॉकर ब्रेक करुन ओपन केले जाईल.

**९) लॉकरधारक मयत झालेस-**

९.१ लॉकरधारकाचा मृत्यू झालेस, लॉकर खातेवर व्यवहार बंद करण्यात येईल व तेथे लॉकरधारक मयत म्हणून लिहीण्यात येईल.

९.२ जर वारस नेमलेला असलेस रितसर सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन, वारसदारास लॉकर ऑपरेट करणेचा अधिकार देण्यांत येईल. वारसदारांनी केवायसी ची पूर्तता करुन देणे आवश्यक आहे.

९.३ जर वारसाची नोंद केली नसेल तर, नियमाप्रमाणे सर्व कायदेशीर वारस रेकॉर्डवर घेवून त्याची संमती घेवून लॉकर मधील वस्तू ताब्यात देण्यांत येतील.

९.४ जर वारस अज्ञान पालक नेमलेला असेल तर अज्ञान पालकाचा पालन कर्त्यास लॉकर ऑपरेट करणेचा अधिकार

राहील. याबाबत सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता बँकेस करुन देणे आवश्यक.

९.५ मुख्य कार्यालयाच्या परवानगीने मयत झालेल्या लॉकर बाबतची कारवाई करणेत येईल.

९.६ सर्व लॉकर धारकाने लॉकर खातेस वारसनोंद करणे आवश्यक आहे.

९.७ लॉकरधारकाचा मृत्यू झालेस व सदर लॉकर ऑपरेट किंवा रिकामा करण्याकरिता त्याचे कायदेशीर वारस किंवा नामनिर्देशित व्यक्तीकडून प्रस्ताव सादर झाल्यास असा प्रस्ताव मिळाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांमध्ये, ठेवीदाराच्या मृत्यूचा पुरावा आणि नामांकनाच्या संदर्भात दावेदाराची योग्य ओळख सादर करण्याच्या अधीन राहून किंवा वारस निश्चित करणारे प्रमानपत्राचे अधीन राहून लॉकरमधील सामग्री परत केली जाईल .

९.८ संचालक मंडळाच्या ग्राहक सेवा समितीस तिमाहीमध्ये मयत वारस प्रकरनाद्वारे बंद झालेल्या लॉकरची माहिती सादर केली जाईल

**१०) लॉकर हाताळणी -**

१०.१ प्रत्येक खातेदाराचे स्वतंत्र रजिस्टर ठेवण्यांत येईल. यामध्ये तारीख, वेळ व सही, फोटो, सेव्हिंग्ज /इतर खाते नंबर,फोन नंबर नमुद करणेत येईल. सदरच्या रजिस्टरमध्ये नोंद करुन नमुना सही तपासुनच खातेदाराचे लॉकर उघडणेस परवानगी दिली जाईल.ऑफिस कामकाजच्या वेळेतच लॉकर ऑपरेट करता येईल.

१०.२ वरील रजिस्टर व्यतिरिक्त , सदर खातेदाराची लॉकर रूम मध्ये प्रवेश करण्या अगोदर,लॉकर रूम मधून बाहेर आल्यावर या दोन्हीच्या वेळ नोंद करून सही घेतली जाईल. या रजिस्टरमध्ये लॉकर ऑपरेट करण्यास गेलेल्या अधिकाऱ्याची देखील सही घेतली जाईल.

१०.२ सदरचे रजिस्टर बँकेचे अधिकारी अगर अनुभवी सेवक हाताळेल, त्यांनी त्यावर नोंदी व सह्या करणे आवश्यक आहे.

१०.३ लॉकरची मास्टर चावी (KEY) शाखाव्यवस्थापकाच्या ताब्यात राहील अगर वेळोवेळी शाखाव्यवस्थापक आदेश देईल त्या अधिका-याच्या ताब्यात राहील. त्याचे हाताळणी रजिस्टर ठेवण्यांत येईल.

१०.४ बँक, खातेदारांची गोपनियता पाळणेची दक्षता घेईल.

१०.५ जर सरकारी आदेशाअन्वये (आयकर, सेल्सटॅक्स विभाग अगर इतर) कोणत्याही विभागाकडूनएखाद्या खातेदाराचे लॉकर सिल करणेबाबत आदेश बँकेस मिळाला नियमाप्रमाणे लॉकर उघडता येणार नाही. याबाबत खातेदारास कळविले जाईल.

१०.६ रजिस्टर नोंदी अद्यावत ठेवणेची संपुर्ण जबाबदारी संबंधित शाखा व्यवस्थापकाची / ठेव अधिका-याची राहील.

१०.७ त्याचप्रमाणे संगणक प्रणालीमध्ये लॉकर उघडलेली व बंद केलेली वेळ याची नोंद केली जाईल

१०.८ ज्या दिवशी लॉकर ऑपरेट झाला त्यादिवशी खातेदाराच्या बँकेकडील नोंदणीकृत मोबाइल क्रमांक तसेच ई मेल वर त्याची माहिती पाठविली जाईल

१०.९ खातेदारासोबत लॉकर रूममध्ये फक्त बँकेचे अधिकृत अधिकारीच लॉकरची मास्टर कि वापरू शकतील

१०.१० मास्टर कि वापरुन झाल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत बँकेचे अधिकारी त्याठिकाणी थांबणार नाहीत

## ११ . लॉकरमधील वस्तू संयुक्त खात्यामधील जिवंत व्यक्ती/नामनिर्देशित व्यक्ती/कायदेशीर वारसांना परत करण्याची प्रक्रिया:

लॉकर्समधील वस्तू खऱ्या नामनिर्देशित व्यक्तीला परत मिळतील याची खात्री करण्यासाठी, तसेच मृत्यूचा पुरावा पडताळण्यासाठी, मुळ दाखल्यावरून सत्यापित केलेली प्रत चालू शकेल तसेच आरबीआयचे KYC संदर्भात असलेल्या मुख्य मार्गदर्शक सुचनेच्या अधीन राहून बँकेच्या संचालक मंडळाने मंजूर केलेल्या केवायसी धोरणानुसार आणि इंडियन बँक असोसिएशन/योग्य अधिकाऱ्यांनी सुचवलेल्या प्रक्रियेचे देखील पालन करेल.

i) जर लॉकर एखाद्या व्यक्तिगत नावाने घेतला असेल व त्याने एका व्यक्तीला नामनिर्देशित केले असेल, जर मुळ लॉकर धारकाचा मृत्यू झाल्यास इतर आवश्यक सर्व कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर बँक अशा नामनिर्देशित व्यक्तीला लॉकरमध्ये प्रवेश देईल आणि लॉकरमधील साहित्य हातळण्याचे स्वातंत्र्य असेल.त्यावेळी लॉकरमधील साहित्याची यादी केली जाईल व त्यावर नामनिर्देशित व्यक्तीची सही व दोन साक्षीदारांची सही घेतली जाईल.

ii. जर लॉकर संयुक्तपणे भाड्याने घेतले असेल आणि संयुक्त स्वाक्षरीने ते चालविण्याच्या सूचना दिल्या असतील आणि खातेदाराने  नामनिर्देशन केले असेल, तर लॉकर भाड्याने घेणाऱ्यांपैकी कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू झाल्यास, जिवंत असलेल्या खातेदारास व नामनिर्देशित व्यक्तीस एकत्रितपणे लॉकर ऑपरेट करण्याचे स्वातंत्र्य दिले जाईल. त्यावेळी लॉकरमधील साहित्याची यादी केली जाईल व त्यावर जिवंत असलेल्या खातेदाराची व नामनिर्देशित व्यक्तीची सही व दोन साक्षीदारांची सही घेतली जाईल

iii. जर लॉकर सर्व्हायव्हरशिप कलमानुसार संयुक्तपणे भाड्याने घेतला असेल आणि भाडेकरूंनी निर्देश दिले असतील की लॉकरचा प्रवेश "एक किंवा सर्व्हायव्हर", "कोणीही किंवा सर्व्हायव्हर" किंवा "माजी किंवा सर्व्हायव्हर" किंवा इतर कोणत्याही सर्व्हायव्हरशिप कलमानुसार देण्यात यावा, तर बँका लॉकर-भाड्याने घेणाऱ्यांपैकी एक किंवा अधिक व्यक्तींच्या मृत्यूच्या बाबतीत आदेशाचे पालन करतील. तथापि, बँका वस्तू हस्तांतरित करण्यापूर्वी खालील खबरदारी घेतील:

(अ) शाखा योग्य कागदोपत्री पुरावे मिळवून वारस/नामनिर्देशित व्यक्तींची ओळख आणि लॉकर भाड्याने घेणाऱ्याच्या मृत्यूची वस्तुस्थिती स्थापित करण्यात योग्य काळजी आणि सावधगिरी बाळगतील;

(ब) मृत व्यक्तीच्या लॉकरमध्ये प्रवेश देण्यापासून बँकेला प्रतिबंधित करणारा सक्षम न्यायालयाचा कोणताही आदेश आहे का हे शोधण्यासाठी शाखा परिश्रमपूर्वक प्रयत्न करतील; आणि

(क) शाखा संयुक्त खात्यातील जीवंत व्यक्ति/नामनिर्देशित व्यक्तीला हे स्पष्ट करतील की त्यांना मृत खातेदाराच्या कायदेशीर वारसांच्या विश्वस्त म्हणून लॉकरमध्ये प्रवेश देण्यात आला आहे. म्हणजेच, त्यांना देण्यात आलेली अशी परवानगी, ज्याला प्रवेश देण्यात आला आहे त्या संयुक्त खात्यातील जीवंत व्यक्ति / नामनिर्देशित व्यक्तीविरुद्ध असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या हक्कावर किंवा दाव्यावर परिणाम करणार नाही.

वरील अटींच्या अधीन राहून, संयुक्त खात्यातील जीवंत व्यक्ति /नामनिर्देशित व्यक्तींना देण्यात आलेली परवानगी बँकेस खातेदाराप्रति असलेल्या जबाबदारीतून मुक्त करेल. अशा परिस्थितीत, लॉकर भाड्याने घेतलेल्या मृत व्यक्तीच्या वारस/नामांकित व्यक्तींना प्रवेश देताना, बँक उत्तराधिकार प्रमाणपत्र, प्रशासन पत्र किंवा प्रोबेट इत्यादी सादर करण्याचा आग्रह धरणार नाही किंवा वारस/ नामनिर्देशित व्यक्तीकडून नुकसानभरपाई किंवा जामीनपत्र मागणी करणार नाही.

जर मृत लॉकर खातेदाराने कोणतेही नामनिर्देशन  केले नसेल किंवा संयुक्त भाड्याने घेतलेल्या व्यक्तींनी स्पष्ट उत्तराधिकारी कलमाद्वारे एक किंवा अधिक उत्तराधिकारींना प्रवेश दिला जाऊ शकतो असा कोणताही आदेश दिला नसेल, तर बँक कायदेशीर वारस/मृत लॉकर खातेदाराच्या

कायदेशीर प्रतिनिधींना प्रवेश देण्यासाठी ग्राहक-अनुकूल दावा प्रक्रिया अवलंबेल. बँकिंग नियमन कायदा, १९४९ च्या कलम ४५ झेडसी ते ४५ झेडएफ आणि को ऑपरेटीव बँकिंग (नामांकन) रूल, १९८५ आणि भारतीय करार कायदा आणि भारतीय उत्तराधिकार कायद्याच्या संबंधित तरतुदींद्वारे देखील बँक कार्यवाही करेल.

शिवाय, जर नामनिर्देशित/ संयुक्त खात्यातील जीवंत व्यक्ति/कायदेशीर वारस लॉकर खाते पुढे चालू ठेवू इच्छित असेल, तर बँक नामनिर्देशित/ संयुक्त खात्यातील जीवंत व्यक्ति /कायदेशीर वारसांशी नवीन करार करेल आणि नामनिर्देशित/कायदेशीर वारसांच्या बाबतीत केवायसी नियमांचे पालन करून लॉकर खाते सुरू ठेवेल.

## ११ सुरक्षा प्रणाली

११.१ लॉकर रूम मध्ये जाणे-येणे करिता फक्त एकच दरवाजा असेल

११.१ लॉकर रूमच्या बाहेर क्लोज सर्किट कॅमेरा लावण्यात येईल ज्यामध्ये लॉकर रूममध्ये जाणाऱ्या व बाहेर येणाऱ्या व्यक्तींचे चेहरे स्पष्ट दिसतील

११.२ क्लोज सर्किट कॅमेरा रेकॉर्डिंग सदर रेकॉर्डिंग दिनांकापासून किमान १८० दिवसापर्यंत जतन केले जाईल किंवा एखाद्या न्याय प्रविष्ट प्रकरणामध्ये योग्य त्या न्याय व्यवस्थेच्या सूचनेनुसार जतन केले जाईल

११.३ वापरात नसलेल्या किंवा रिकामा करून परत केलेल्या लॉकरच्या चाव्या सीलबंद पाकिटात ठेवल्या जातील

११.४ लॉकर रूममध्ये एखादा खातेदार लॉकर ऑपरेट करीत असताना टी दरम्यान लॉकर रूम मध्ये जाण्यास कोणासही परवानगी दिली जाणार नाही त्याकरिता ग्रील गेट आतून बंद करण्याची सुविधा उपलब्ध केली जाईल

११.५ लॉकर ची मास्टर की ताब्यात असणाऱ्या अधिकाऱ्याने शाखेचे दिवसभराचे कामकाज संपल्यावर शाखा बंद करण्याअगोदर दररोज रोककेर रुमं मध्ये जावून सर्व लॉकर व्यवस्थित कुलूपबन्द आहेत याची खात्री करावी. जर एखादा लॉकर व्यवस्थित बंद नसल्याचे निदर्शनास आल्यास खातेदारास त्याचे रजिस्टर मोबाइल किंवा ईमेल वर खातेदारास सूचित करून लॉकर कुलूपबंद केला जाईल

## १२) ग्राहक सुविधा-

१२.१ लॉकरधारकास सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यांत येतील, उदा. पाणी, लाईट, पंखा, इ.

१२.२ खातेदाराची कोणतीही तक्रार/सूचना असेल तर त्यास तक्रार पेटी उपलब्ध करुन देण्यांत येईल.

१२.३ बँकेच्या कामकाजाच्या वेळेत लॉकर उघडणेत येईल व लॉकर उघडणेची वेळ, शाखा नोटीस बोर्डावर अथवा
लॉकरच्या ठिकाणी प्रसिध्द करणेत येईल. सदरची वेळ बदलणेचा अधिकार बँकेस राहील.
१२.४ ज्या त्यावेळी लॉकर भाड्याची रक्कम वसुल करणेची जबाबदारी शाखाव्यवस्थापक याची राहील.
१२.५ लॉकर भाडे येणे दाखवून उत्पन्नात घेण्यात येवू नये. प्रत्यक्ष वसुल झालेले भाडेच उत्पन्नात घेण्यात यावे.

**१३) वापरात नसलेल्या लॉकर्सबाबत-**

१३.१ लॉकर धारकाने बँकेचे लॉकरचा वापर करणे आवश्यक आहे. जर लॉकर १ वर्षापेक्षा जादा कालावधीमध्ये वापरत नसल्यास व भाडे वेळेत भरत नसल्यास त्याबाबत संबधीत लॉकर धारकास नोटीसीने कळवुन त्याची पोहच
दप्तरी ठेवणेत यावे. तरीही त्याचा प्रतिसाद मिळत नसलेस लॉकर बंद करणेचा अधिकार बँकेस राहील. व रितसर जाहीरात नोटिस देवून नियम क्र.७ व ८ प्रमाणे कारवाई करावी.
१३.२ लॉकर धारकाकडून बदली अथवा अन्य कारणामुळे बाहेर गावी असल्यामुळे लॉकरचा वापर केला जात नसल्याचे कळविले तर अशा परिस्थितीस बँक त्यांच्या विनंती अर्जाचा विचार करुन लॉकर सुविधा वापरण्यास परवानगी दिली जाईल.
१३.३ लॉकर धारकांकडून लॉकरचा वापर केला जात नसेल तर लॉकर धारकास लॉकर बापरासंबधी नोटीस द्यावी व अशी नोटीस देवून देखील लॉकर धारक प्रतीसाद देत नसेल तर सदरचे लॉकर ब्रेक ओपन केले जाईल. याबाबत
कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
१३.४ लॉकरचे भाडे संचालक मंडळाने वेळोवेळी ठरविल्या दराप्रमाणे लॉकर भाडे घेणेत येईल. त्यामध्ये बदल
करण्याचा अधिकार बँकेस राहिल. परंतु झालेल्या बदलाबाबतची माहितीलॉकर धारकास ज्या-त्या वेळी
कळविणेची जबाबदारी संबधित शाखाधिकारी व ऑफ़िसर यांची राहिल.
१३.५ लॉकर ठेव/डिपॉझिट रक्कम १ वर्षाच्यापुढे ३वर्षाच्या मुदतीने ठेवुन सदर कालावधीसाठी लागु असलेले
व्याजदर लागु राहील व ते ॲटो रिन्युअल करावे. सदरची ठेव लीन मार्क करणेत यावे व ठेवीची पावती
डिसचार्ज करुन लॉकर कागदपत्राबरोबर ठेवणेत यावी.
१३.६ लॉकर ठेव लॉकर धारकाचे नावे ठेवली जाईल.

**१४) इतर बाबी-**

१४.१ बँकेने वेळोवेळी लॉकर भाडेने देणे संबंधित केलेले नियम/बदल हे लॉकर धारकास लागू राहतील.

१४.२ शाखेचे स्थंलातर करताना किंवा बंद करताना लॉकर धारकास बँकेकडे त्यांनी नोंदविलेल्या पत्यावर कळविणेत येईल.

१४.३ लॉकर धारकांना लॉकरचा वापर करण्यासाठी दिलेल्या चावीची शहानिशा करणेसाठी बँक त्या चावीवर बँकेचे नांव Embossकेले असल्याची खात्री करुनच लॉकर धारकास लॉकर उघडणेसाठी परवानगी दिली जाईल.

लॉकरच्या सर्व चाव्यांवर बँकेचे नाव (Key) Emboss असल्याची खात्री करणेची जबाबदारी शाखेची राहील.

१४.४ लॉकरधारकाला भाडे घेवून सदर लॉकर पोटभाडयाने देता येणार नाही. तसेच लॉकरचा वापर फक्त महत्वाच्या व मौल्यवान वस्तू, दस्ताऐवज इ. ठेवणेसाठी करणेचा आहे. स्फोटक, विनाशकारी व बंदीच्या वस्तू लॉकरमध्ये ठेवता येणार नाहीत.तसे निदर्शनास आल्यास बँकेकडून सर्व गोष्टींची खातरजमा करून योग्य ती कारवाई केली जाईल.

१४.५ बँकेने लॉकरसंबंधी कोणतीही नोटीस अगर पत्रव्यवहार रजिस्टर पोस्टाद्वारे केल्यास किंवा रजिस्टर इमेल द्वारे केलेस ती नोटीस अगर पत्रव्यवहार त्यास योग्यप्रकारे लागू झाली असे समजण्यात येईल. खातेदार दिलेल्या पत्त्यावर आढळून आला नाही तर बँकेच्या नोटीस बोर्डावर त्याबद्दल जाहीर नोटीस प्रसिध्द केली जाईल. त्यामुळे लॉकरधारकाने आपला बदललेला पत्ता, पुराव्यासह,बँकेकडे वेळोवेळी नोंद करणे आवश्यक आहे.

१४.६ लॉकर एका जागेवरुन अन्यत्र हलविताना अगर काही अघटीत घटनेने लॉकरमधील चीजवस्तूंची नुकसानी झालेस त्याची जबाबदारी बँकेची नाही अथवा त्याचा विमा क्लेम मिळणार नाही; कारण त्याचा विमा उतरविला जात नाही.

**१४.७ . भूकंप, पूर, वादळ, वीज पडणे इत्यादी नैसर्गिक आपत्तींमुळे किंवा ग्राहकाच्या केवळ निष्काळजीपणामुळे उद्भवणाऱ्या बँकांची जबाबदारी**

नैसर्गिक आपत्तींमुळे किंवा भूकंप, पूर, वीज पडणे आणि वादळ यासारख्या घटनांमुळे किंवा ग्राहकाच्या केवळ चुकीमुळे किंवा निष्काळजीपणामुळे उद्भवणाऱ्या कोणत्याही कृतीमुळे लॉकरमधील सामग्रीचे कोणतेही नुकसान झाल्यास बँक जबाबदार राहणार नाही. तथापि, बँक परिसराचे अशा आपत्तींपासून संरक्षण करण्यासाठी लॉकर सिस्टमची योग्य काळजी घेतली जाईल.

**आग, चोरी, घरफोडी, दरोडा, दरोडा, इमारत कोसळणे किंवा बँकेच्या कर्मचाऱ्यांनी केलेल्या फसवणूकीच्या बाबतीत  बँकेची जबाबदारी**

ज्या जागेत सेफ डिपॉझिट लॉकर आहेत त्या जागेच्या सुरक्षिततेसाठी सर्व पावले उचलण्याची जबाबदारी बँकेची आहे. बँकेच्या आवारात आग, चोरी/घरफोडी/दरोड्याच्या घटना घडू नयेत याची खात्री करण्याची जबाबदारी बँकेची आहे. वर नमूद केलेल्या घटनांमुळे किंवा त्यांच्या कर्मचाऱ्यांनी केलेल्या कृत्यामुळे लॉकरमधील सामानाचे नुकसान झाले आहे, अशा परिस्थितीत बँकेची जबाबदारी सेफ डिपॉझिट लॉकरच्या प्रचलित वार्षिक भाड्याच्या शंभर पट रकमेइतकी असेल.

**१५  जोखीम व्यवस्थापन, पारदर्शकता आणि ग्राहक मार्गदर्शन**

**शाखा विमा पॉलिसी**

ज्यामुळे लॉकरमधील सामानावर परिणाम होतो अशा आपतींच्या बाबतीत संचालक मंडळाच्या मान्यतेने, दरोडा, आग, नैसर्गिक आपत्ती, शाखा स्थलांतर/विलीनीकरणादरम्यान होणारे नुकसान इत्यादी घटनांमुळे होणारे नुकसान कमी करण्यासाठी शाखा विमा पॉलिसी असेल.

**ग्राहकाकडून लॉकरमधील वस्तूंचा विमा**

लॉकर करारात स्पष्ट केले जाईल की बँक लॉकरमधील वस्तूंची किंवा ग्राहकाने त्यातून काढलेल्या किंवा त्यात ठेवलेल्या कोणत्याही वस्तूंची नोंद ठेवत नसल्यामुळे, लॉकरमधील वस्तूंचा कोणत्याही जोखमीपासून विमा उतरवण्याची जबाबदारी बँकेवर राहणार नाही. बँक कोणत्याही परिस्थितीत लॉकरमधील वस्तूंच्या विम्यासाठी त्यांच्या लॉकर भाड्याने घेणाऱ्यांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कोणतेही विमा उत्पादन देऊ करणार नाही.

**ग्राहक मार्गदर्शन आणि प्रसिद्धी**

• बँकेच्या वेबसाइटवर आणि ज्या शाखांमध्ये लॉकर सुविधा उपलब्ध करून देत आहेत विविध पैलूंवरील मॉडेल लॉकर करार प्रदर्शित करेल. ग्राहकांना त्या सुविधांचा लाभ घेण्यासाठी बँकेच्या अटी आणि शर्तींबद्दल जागरूक केले आहे याची खात्री केली जाईल.

• बँक त्याच्या वेबसाइटवर सुरक्षित ठेव लॉकरसाठीच्या सर्व प्रकारच्या शुल्कांबद्दल अद्ययावत माहिती प्रदर्शित करेल.

• बँक त्याच्या वेबसाइटवर मृत लॉकर भाड्याने घेणाऱ्याच्या लॉकर / वाचलेल्या व्यक्ती / कायदेशीर वारसांना प्रवेश देण्यासाठी तयार केलेल्या धोरणे / प्रक्रियांसह सूचना त्यांच्या

वेबसाइटवर पोस्ट करेल. शिवाय, त्याची छापील प्रत नामनिर्देशित व्यक्ती / वाचलेल्या व्यक्ती / कायदेशीर वारसांना देखील दिली जाईल